नोटीस

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
माध्यमिक शिक्षण विभाग
माध्य/शि/०१/कावि/६६/२०२५
दिनांक-२४/०१/२०२५

प्रति,
श्री.चव्हाण अंकुश रामराव (सहाय्यक शिक्षक)
माध्यमिक विद्यालय,नेहरूनगर भागशाळा
च-होली

विषय – सेवाजेष्ठता यादीतील रूजू दिनांकाबाबत......

२/-तुम्ही पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक शिक्षण विभागा अंतर्गत माध्यमिक विद्यालय,नेहरूनगर भागशाळा च-होली या विद्यालयात सहाय्यक शिक्षक या जबाबदारीच्या पदावर कार्यरत आहात.तुम्हाला सहाय्यक शिक्षक पदाची जबाबदारी व कर्तव्य ज्ञात असणे तुम्हास आवश्यक आहे.

माध्यमिक शिक्षण विभागाने दि.०१/०१/२०२४ ची रोजी कार्यरत असलेल्या बी.एड. संर्गातील सहाय्यक शिक्षकांची प्राथमिक सेवाजेष्ठता यादी दि.०६/०३/२०२४ रोजी प्रसिद्ध करणेत आलेली होती, त्याबाबत ज्या शिक्षक कर्मचा-यांचे सेवाजेष्ठता यादीमध्ये काही दुरूस्ती असतील त्यांना १५ दिवसात मुख्याध्यापक यांच्या मार्फत हरकती घेण्यास आदेश निर्गमीत करणेत आलेले होते. सदर कालावधीत तुम्ही मा.वि.क्रीडाप्रबोधिनी या विद्यालयात कार्यरत होता. तुम्ही विद्यालयात दि.१४/०३/२०२४ रूजु तारखेबाबत हरकत घेतलेली आहे. यामध्ये तुम्ही असे नमुद केले आहे कि माझी सेवाजेष्ठता यादी मध्ये रूजु दिनांक १६/०८/२०१० अशी नमुद केलेली आहे, परंतु माझी सेवानोंद पुस्तकात प्रत्यक्ष रूजु दिनांक – २६/०७/२०१० अशी आहे. परंतु प्राथमिक सेवाजेष्ठता यादी मध्ये नजरचुकीने १६/०८/२०१० अशी झाली आहे. सदर रूजु तारखेत बदल करणेस विनंती केलेली आहे.सदर हरकत मुख्याध्यापक यांना सादर केलेली आहे, त्यानुसार मुख्याध्यापक यांनी क्रीप्रबो/०१/कावि/९०/२०२४ दि.१५/०३/२०२४ रोजी मुख्यकार्यालयाकडे रूजु तारखेत बदल करणेस शिफारस केलेली आहे.

वरील हरकत व मुख्याध्यापक यांनी सेवानोंद पुस्तकाच्या रूजु तारखेच्या पानाची छायांकित प्रत व शिफारसीचे विचार करता सेवाजेष्ठता अंतिम यादीमध्ये रूजु तारीख १६/०८/२०१० ऐवजी २६/०७/२०१० अशी करणेत आलेली आहे. तथापी अंतीम यादी प्रसिद्ध केल्यानंतर इतर शिक्षकांच्या तक्रारी व तुमचे मुळ सेवानोंद पुस्तकाची पडताळणी केली असता तुमच्या मुळसेवानोंद पुस्तकात १६/०८/२०१० च्या तारखेवर खाडाखोड करून २६/०७/२०१० असे केल्याचे दिसुन येत आहे. तुम्ही दि.१९/१२/२०२४ च्या पत्रानुसार माझी रूजु तारीख १६/०८/२०१० अशी आहे. त्यामुळे रूजु दिनांक बदल करणेस मुख्याध्यापक यांना पत्र दिलेले आहे. सदर कालावधीत तुमची नेहरूनगर या विद्यालयात बदली झाली असल्याने मा.वि.नेहरूनगर यांनी सदर पत्र कोणत्याही ठोस पुरावे नसताना मुख्यकार्यालयास दि.२४/१२/२०२४ रोजी पाठवलेले आहे. सदर बाबी प्रशासकीय कामकाजाच्या दृष्टीकोनातुन अतिशय गंभीर स्वरूपाच्या आहेत.

तरी तुम्हास या नोटीसीव्दारे सुचित करणेत येते की तुम्ही माध्यमिक शिक्षण विभागामध्ये / विद्यालयामध्ये रूजु झालेची तारीख तुम्हास माहीती असणे आवश्यक आहे,तरी देखील तुम्ही मुळसेवानोंद पुस्तकातील खाडाखोड केलेल्या तारखेवर हरकत घेतल्याचे निर्दशनास आलेले आहे, व तदनंतर परत माझी रूजु तारीख १६/०८/२०१० अशी असुन सेवाजेष्ठता यादीमध्ये २६/०७/२०१० ऐवजी १६/०८/२०१० अशी दिनांक – १९/१२/२०२४ च्या अर्जान्वये करणेबाबत विंनती केलेली आहे.यावरून असे निर्दशनास येते की तुम्ही प्रशासन विभागाची दिशाभुल केल्याचे निर्दशनास येत आहे. सदर बाब प्रशासकीय व शैक्षणिक कामकाजाच्या दृष्टीकोनातुन अतिशय गंभीर स्वरूपाची आहे.

सबब,तुम्ही केलेल्या कार्यालयीन शिस्तिबाबत तुमच्यावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम (५६)(२)(ड) नुसार कारवाई का करण्यात येऊ नये? याचा लेखी खुलासा सदर नोटीस प्राप्त झालेपासून ०७ दिवसांच्या आत विद्यालयामार्फत सादर करावा.विहीत मुदतीत खुलासा प्राप्त न झाल्यास अथवा केलेला खुलासा असमाधानकारक असल्यास तुमचेवर उक्त नोटीसमध्ये केलेली कारवाई करण्यात येईल याची स्पष्ट नोंद घ्यावी.

(विजयकुमार थोरात)
सहाय्यक आयुक्त
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी पुणे - १८

प्रत,

१) मुख्याध्यापक मा.वि.नेहरूनगर
   २/- सदर नोटीस संबधीतांना बजाउन पुर्तता अहवाल इकडिल कार्यालयास सादर करणेत यावा.

२) मा.अतिरिक्त आयुक्त (१),
   मा.माहितीसाठी सविनय सादर.